# ई - पोलीस पत्रिका

दि १४/११/२०२२ अनु.क्र. २०७

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१. पोआअ/पशा-१/नेमणुक/आस्थापना मंडळ/१३६१३/२०२२ अमरावती शहर दि.१२/११/२०२२**

### आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या पोलीस घटकातील पोलीस स्टेशन/शाखेमध्ये कार्यरत असलेल्या तथापी विहीत कालावधी पुर्ण न झालेल्या पोलीस निरीक्षक यांची नेमणुक/बदली प्रशासकीय कारणास्तव तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेशापर्यंत त्वरीत प्रभावाने त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी नाव | पदनाम | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | आस्थापना मंडळाचा तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकी बाबत निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.अनिल कुरळकर | पोलीस निरीक्षक | ठाणेदार-पो.स्टे.फ्रेजरपुरा, अमरावती शहर | विशेष शाखा, अमरावती शहर |
| २ | श्री.गोरखनाथ जाधव | पोलीस निरीक्षक | विशेष शाखा, अमरावती शहर | ठाणेदार-पो.स्टे.फ्रेजरपुरा, अमरावती शहर |

**२. पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुरी/१३६६२/२०२२ अमरावती शहर दि.१४/११/२०२२**

### आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | अर्जित रजा कालावधी | अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती सुवर्णा वडनेरकर, व.श्रे.लिपीक | पत्रव्यवहार शाखा | दि.१५/११/२०२२ ते दि.२२/११/२०२२ पर्यंत एकुण ०८ दिवस | श्री.मिलीद खानदेशकर, क.श्रे.लिपीक, पत्रव्यवहार शाखा |

**३. पोआअ/वि.चौ.-१/कसुरी/निलंबन/पोना/१५९ संजय डेरे+१/१३६१२ /२०२२ अमरावती शहर दि.१२/११/२०२२**

## आदेश

तुम्ही पो.ना./१५९, संजय डेरे व पो.ना./१०६, मिर्झा नईम शेख, पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे नेमणूकीस असतांना पो.स्टे.फ्रेजरपुरा येथे दाखल अप क्र.७०५/२०२२ कलम ३०७,३४ भा.द.वि.मधील आरोपी नामे नितीन उर्फ बबलु भगवंत गाडे हा जखमी असल्याने त्यास उपचाराकरीता रेडीअंट सुपर स्पेशालीटी हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. सदर आरोपीवर वॉच ठेवण्याकरीता दिनांक ११.११.२०२२ रोजी वॉचर्स म्हणुन  दिवसपाळीकरीता तुम्ही दोन्ही अंमलदारांची डयुटी लावण्यात आली होती.  सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याने तो हॉस्पीटल मधुन संधी पाहुन पळुन जावु शकतो म्हणुन सतर्कतेने डयुटी करण्याबाबत तुम्हाला पुर्व सुचना दिली होती. तुम्ही दोन्ही अंमलदारांची आरोपी बबलु गाडे यांच्यावर वॉचर्स म्हणुन डयुटी असतांना तुमच्या डयुटीमधुन आरोपी बबलु गाडे हा पळुन गेला. तुम्ही पोलीस खात्यात जबाबदार अशा पदावर कार्यरत असतांना तुम्ही दोन्ही अंमलदारांनी अत्यंत निष्काळजीपणे बेजबाबदारपणे वागुन गैरशिस्त पणाचे वर्तन केले आहे.

तुमच्या उपरोक्त कर्तव्यावरील गंभीर गैरवर्तनाचे कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा जनसामान्य मानसात मलीन झाली आहे. करीता तुम्हास महाराष्ट्र मुंबई पोलीस कायदा १९५१ मधील नियम २५ मधील १ (ख) आणि मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपील) १९५६ नियम ३ (१) (अ-२)  च्या तरतुदीनुसार तसेच निभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदी नुसार आदेशाच्या दिनांकापासुन शासन सेवेतुन निलंबित  करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहणअवधी, स्वियेत्तर सेवा आधि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८ नुसार निलंबनाच्या आदेश अस्तित्वात असे पर्यत तीन महाने पावेतो त्यांना अर्धपगारी वेतना इतका उदरनिर्वाह भत्ता व त्यावर मिळणारे दरमहा इतर भत्ते अनुज्ञेय राहतील.तसेच निलंबनात ३ महिण्याचा कालावधी पुर्ण झाल्यावर त्यांनी खाजगी नोकरी अथवा उद्योग धंदा केला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केल्यानंतर त्यांचा निर्वाह भत्ता वाढवुन देण्याबाबत विचार करण्यात येईल.

सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यत आपणास कोणत्याही प्रकारचा खाजगी उदयोग अथवा नोकरी करता येणार नाही. जर या कालावधीत त्यांनी कोणतीही खाजगी नोकरी अथवा उदयोग केला असल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तनुक) नियम १९७९ च्या अंतर्गत शिस्तभंगाविषयक कार्यवाहीस पात्र राहाल.

निलंबन कालावधीत तुमचे मुख्यालय हे पोलीस मुख्यालय अमरावती शहर येथे राहिल. तुम्हास आमचे पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.  तसेच तुम्हास सकाळी व सायंकाळी आपल्या मुख्यालयात हजरी देणे अनिवार्य राहील.

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस